शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविणेबाबत..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकीर्ण -९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १ फेब्रुवारी, २०१७

वाचा -

१) केंद्र शासनाची अधिसूचना दिनांक २७/८/२००९
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१०/प्र.क्र. २१२(बी)/पीई-१, दिनांक ११/१०/२०११
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१२/प्र.क्र. ११२/पीई-१, दिनांक १५/०३/२०१३
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१४/प्र.क्र.४५/पीई-१, दिनांक १५/०५/२०१४.
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन क्रमांक संकीर्ण-९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१, दिनांक १०/०१/२०१७

शासन शुध्दीपत्रक -

उपरोक्त संदर्भाधिन दि.१०/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५% राखीव जागांकरिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २१ (ब) **“शाळांनी प्रवेशस्तराचा वयोगट २३/०१/२०१५ च्या शासन निर्णयानुसार भरावा. सन २०१७-१८ या वर्षी इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या बालकाचे दि. ३०/०९/२०१६ रोजी किमान वय ५.४ वर्ष इतके असेल. त्यामुळे सॉफ्टवेअर मध्ये ५.४ वर्षे वयाच्या आधिची बालके इयत्ता १ ली मध्ये नोंदविली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी”,** असा आहे. त्याऐवजी परिच्छेद क्रमांक २१ (ब) **“शाळांनी प्रवेशस्तराचा वयोगट २३/०१/२०१५ च्या शासन निर्णयानुसार भरावा. सन २०१७-१८ या वर्षी इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या बालकाचे दि. ३०/०९/२०१७ रोजी किमान वय ५.४ वर्ष इतके असेल. त्यामुळे सॉफ्टवेअर मध्ये ५.४ वर्षे वयाच्या आधिची बालके इयत्ता १ ली मध्ये नोंदविली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी”,** असा वाचण्यात यावा.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०२०११५३२२०६७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2017.02.01 16:05:47 +05'30'

(बी.आर.माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
२) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४) मा. मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
८) संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) संचालक, बालभारती, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
११) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१२) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सर्व
१३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व
१५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर शिक्षण)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे सर्व
१६) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
१७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)